**॥ श्री ॥**
**॥ बाबा ॥**

जीवनाचे असावे ध्येय
काया वाचा अर्पूनी मन
बाबांचरणी लीन ॥ धृ॥

का ह्रदयी हा मी वसतो
हर गोष्टीत कान टवकारतो
दुरावुनी नाते बाबांशी
मोक्षपदाला अंतरतो
मी म्हणजे बाबा आहे
हे धरुन चाला ॥ 1 ॥

दुर राहुनी मना खेद का वाटे
नयनी आंसू का यावे
आटापिटा वेडा जीव का करे
खेपा बाबांकडे का मारे
आहे मी तुमच्यामध्ये
फक्त एकदाच स्मरा ॥ 2 ॥

घालवुनी मीपणा देहाचा
आत्मज्योत ती जागवा
जागृत आत्मज्योत जाळी पंचप्राणा
जरी राजी नाही ते नाश पाया
सोडुन गुंतागुंत देहाची
मार्ग करी सोपा ॥ 3 ॥

★★★★★